**दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६**

**विविध अग्रिमांची परतफेड केली नाही**
**राज्यातील १० सहकारी दूध संघाचे सदस्य निवडणुकीस अपात्र**

मुंबई दि.३ फेब्रुवारी – महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ अर्थात महानंद या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळ निवडीसाठी राज्यातील १० सहकारी दूध संघांचे सदस्य, त्यांनी घेतलेल्या विविध अग्रिमांची विहित मुदतीत परतफेड न (न) केल्यामुळे हे सर्व सदस्य संचालक म्हणून नियुक्त होण्यास, नामनिर्देशित होण्यास, निवडून येण्यास किंवा स्वीकृत सदस्य होण्यास अपात्र ठरले आहेत. महानंद या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळ निवडीसाठी निवडणूक प्रक्रीया सुरु आहे. महानंद चे ८६ सदस्य संघ असून निवडणूकीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये एकूण ६६ सदस्य जिल्हा/तालुका सहकारी दूध संघ मतदार म्हणून दर्शविण्यात आले आहेत.

सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दूध महासंघाचे थकबाकीदार असलेल्या पुढील १० दूध संघांना नियमानुसार कारणे दाखवा नोटीस बजावली व सुनावणी घेतली. त्यानंतर या संघांना महासंघाकडून दसवडा अग्रिम/विशेष अग्रिम/प्रकल्प अग्रिम/पशुखाद्य विक्री तसेच सेवा शुल्क अशा विविध शीर्षकाखाली त्यांनी घेतलेल्या अग्रिमाची परतफेड ३० दिवसात अथवा विहित मुदतीत रक्कम स्वरुपात किंवा दूध पुरवठा स्वरुपात केली नसल्यामुळे हे जिल्हा/तालुका दूध संघ महासंघाचे थकबाकीदार ठरले आहेत. परिणामी संचालक मंडळ निवडीकरीता ते व त्यांचे मतदार प्रतिनिधी निवडून येणाऱ्या नवीन संचालक मंडळावर संचालक म्हणून नियुक्त होण्यास, नामनिर्देशित होण्यास, निवडून येण्यास किंवा स्वीकृत सदस्य होण्यास अपात्र ठरले आहेत.

अपात्र ठरलेले सदस्य संघ व त्यांची थकबाकीची रक्कम (रुपये लाखात) –**(१)** बुलढाणा जिल्हा सहकारी दूध संघ-रु.३५.९७. **(२)** सोनहिरा तालुका सहकारी दूध संघ (सांगली) रु.१६.६४.**(३)** शेवगांव तालुका सहकारी दूध संघ,अहमदनगर रु.३६.८९. **(४)** नाशिक जिल्हा सहकारी दूध संघ रु.४९.८८.**(५)** दूधगंगा तालुका सहकारी दूध संघ, इंदापूर, पुणे रु.३१.८०. **(६)** श्रीरामपूर तालुका सहकारी दूध संघ, अहमदनगर रु.४.४३. **(७)** चंद्रपूर जिल्हा सहकारी दूध संघ रु.१३.३४. **(८)** चाळीसगांव तालुका सहकारी दूध संघ,जळगांव रु.२.८१. **(९)** भूम तालुका सहकारी दूध संघ व १० जालना जिल्हा सहकारी दूध संघ हे दोन्ही संघ अवसायनात गेले आहेत.

वरीलपैकी चाळीगांव तालुका सहकारी दूध संघाने त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली असली तरी हा संघ अंतरिम अवसायनात असल्यामुळे हा संघ व त्याचे प्रतिनिधी प्रमोद पाटील हे आता होणाऱ्या महासंघाच्या निवडणुकीत पुन्हा निवडून येण्यास अपात्र ठरले आहेत.

नियमानुसार राज्यातील नोंद झालेले जिल्हा अथवा तालुका दूध संघ किंवा संस्था हेच महासंघाचे सदस्य असू शकतात. त्यामुळे बहुराज्यीय सहकारी दूध संस्था संघ हे महासंघाचे सदस्य राहू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना निवडणूक प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही.

*******************************